# मुख्य कार्यालय, विरार
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**


**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
दिनांक २५ मार्च २०२६

मालमत्ता कर विभाग
प्रेस नोट

खुश खबर ! खुश खबर ! खुश खबर !!!

"मालमत्ता कर थकबाकीदारांसाठी 'अभय योजना २०२५-२६' ला दि. ३१ मार्च २०२६ पर्यंत मुदतवाढ"

वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता धारकांसाठी एक अत्यंत महत्त्वाची बातमी आहे. महानगरपालिकेने थकीत मालमत्ता करावरील शास्ती (दंड) माफीसाठी राबवलेल्या *'अभय योजना २०२५-२६*' ला नागरिकांकडून मिळालेला उदंड प्रतिसाद आणि मागणी लक्षात घेऊन, या योजनेस दिनांक *३१ मार्च २०२६* पर्यंत *मुदतवाढ* देण्याचा निर्णय घेतला आहे.

*या योजनेचा तपशील खालीलप्रमाणे आहे:*

*मुदतवाढीचा कालावधीः* ही योजना आता दिनांक २६/०३/२०२६ पासून दिनांक ३१/०३/२०२६ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत लागू राहील.

*योजनेचा लाभः* जे मालमत्ता धारक त्यांच्या थकबाकीची संपूर्ण रक्कम (मुद्दल) एकरकमी भरतील, त्यांना थकीत रकमेवरील शास्तीमध्ये (दंडामध्ये) नियमानुसार सवलत दिली जाणार आहे.

*कुठे भरणा करावाः* मालमत्ता धारक आपला कर सर्व प्रभाग समिती कार्यालयांमध्ये किंवा महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावरून (Online) भरू शकतात.

मालमत्ता कराची थकबाकी असलेल्या नागरिकांनी ही शेवटची संधी समजून, ३१ मार्चपूर्वी आपल्या कराचा भरणा करावा आणि शास्ती माफीच्या या विशेष योजनेचा लाभ घ्यावा. ३१ मार्चनंतर थकबाकीदारांविरुद्ध जप्तीची कारवाई तीव्र करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

*आयुक्त,*
*वसई-विरार शहर महानगरपालिका*